**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २५२ । सोमवार ६ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# अभिषेक कळमकचा अटकपूर्व जामीन तिसऱ्यांदा फेटाळला

## नोकरीचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार केल्याचे प्रकरण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर शहराचा माजी महापौर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर याचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे. नोकरीचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार केल्याचा गंभीर गुन्हा दाखल झाल्यानंतर कळमकरने यापूर्वी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता. जिल्हा न्यायालयाने हा अर्ज फेटाळला. त्यानंतर कळमकरने मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता. खंडपीठानेही त्याचा अर्ज फेटाळला होता. त्यानंतर आता पुन्हा कळमकरने जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. जिल्हा न्यायालयाने दुसऱ्यांदा अटकपूर्व जामीन नाकारल्याने कळमकरच्या अडचणीत वाढ झाली आहे.

अभिषेक कळमकर याने पीडित तरुणीशी संपर्क साधला व नोकरीचे आमिष दाखवून नगर शहरात तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर येथे एका लॉजवर बोलावून अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.
गुन्हा दाखल झाल्यापासून कळमकर फरार आहे.

### परस्पर संमतीने संबंध आल्याचा युक्तिवाद

आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद करताना संबंधित तरुणीच्या संमतीने शरीरसंबंध झाले आहेत, फिर्यादीत नमूद विळद घाटातील घटना काल्पनिक आहे असा युक्तिवाद केला. यापूर्वी दोनदा आरोपीचा अटकपूर्व जामीन फेटाळला आहे. त्यामुळे आरोपीला जामीन अटकपूर्व जामीन मंजूर करावा अशी बाजू न्यायालयासमोर मांडली. मात्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला.

## घोडेगावच्या शाखेतील गैरव्यव्हारप्रकरणी

# नागेबाबा मल्टीस्टेट संस्थेने स्वत:हून गेला गुन्हा दाखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नागेबाबा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटीच्या घोडेगाव येथील शाखेतील कर्मचाऱ्यांकडून झालेल्या गैरव्यव्हारप्रकरणी पाच कर्मचाऱ्यांवर स्वतःहून सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश आहे.

दिलीप रमेश पातोरे, किशोर बाबासाहेब खरपुडे, शुभम बाबासाहेब रासकर, सौरभ रामनाथ दहितुले, रेणुका बाळासाहेब चौरे अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.
संस्थेने नेहमीच सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत असून खातेदारांनी संस्थेला दिलेल्या पुराव्याच्या आधारे व अंतर्गत लेखापरीक्षणाच्या वेळी केलेल्या तपासणी अंतर्गत काही महत्वाचे मुद्दे समोर आले त्यानुसार संस्थेतील घोडेगावच्या शाखेतील कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या पाचही कर्मचाऱ्यांची आर्थिक गैरव्यव्हार प्रकाराची बाब आंतर्गत दपासणी दरम्यान निदर्शास आली.या प्रकरणात कोणतीही बाब दडपुण न ठेवता संस्थेने स्वतःहून पुढाकार घेत संबधीत कर्मचाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. या सर्व पाचही कर्मचाऱ्यांविरुध्द पुरावे संकलीत केल्यानंतरच त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या गैरव्यवहारामुळे ज्या खातेदारांचे नुकसान झाले आहे. त्या सर्व संबधीत खातेदारांचे संबधीत रक्कम संस्थेने परत केली आहे. त्यामुळे कोणत्याही सभासदांचे आर्थिक नुकसान होणार नाही याची संस्थेचे वतीने पुर्ण खबरदारी घेण्यात आली आहे.

### सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य

संस्थेचा मुलमंत्र पारदर्शकता , प्रामाणिकपणा आणि सभासदांचे हित हा कायम असून भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून अंतर्गत नियंत्रण व्यवस्था अधिक संक्षम करण्यात आली असून सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य राहणार असल्याचे संस्थेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# सततच्या पावसाच्या सरींनी जनजीवन विस्कळीत; विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरात आज पहाटेपासून सुरू झालेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सकाळच्या वेळेत पावसाचा जोर कायम राहिल्याने शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचा वेग मंदावला, तर अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

शाळा सुरू होण्याच्या वेळेतच पाऊस सुरू असल्याने विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ उडाली. अनेक विद्यार्थी रेनकोट व छत्रीच्या साहाय्याने शाळेत पोहोचले, तर लहान मुलांना पालकांनी स्वतः शाळेत सोडण्यासाठी धावपळ केली. काही ठिकाणी शाळेबाहेर पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना पाण्यातून वाट काढत शाळेत जावे लागले.

शहरातील सखल भाग, चौक आणि अंतर्गत रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. कार्यालयीन वेळ असल्याने कामावर जाणाऱ्या नागरिकांनाही पावसाचा सामना करत प्रवास करावा लागला.

# आनंदनगर येथील महावितरण विद्युत वाहिनी खांबाला चिकटून तीन वर्षाच्या मुलीचा मृत्यू

## महावितरणच्या दोषी अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी यासाठी शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**प्रभाग क्रमांक १५ आनंदनगर येथील महावितरण विदयुत वाहिनी खांबाला चिकटून तीन वर्षाच्या मुलीचा मृत्यू आज सकाळी झाला याबाबत येथील नागरिक यांनी संबंधित पोलची दुरुस्ती करावी म्हणून सातत्याने महावितरण विभागाला पत्र देखील दिले होते परंतु त्याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही यामुळेच आज एका लहान मुलीचा मृत्यू झाला या महावितरण च्या गलथान कारभारामुळे नागरिकांमध्ये चीड निर्माण झाली आहे या दोषी अधिकारी यांच्यावर कारवाई करावी या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी शिवसेना शहरी प्रमुख संभाजी कदम ,गटनेते दत्तात्रय कावरे ,परेश लोखंडे ,काका शेळके ,नितीन भुतारे आदी उपस्थित होते

# १० टक्के आरक्षित जागा न सोडताच लेआउट मंजुरी

## सहसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त चौकशी सुरू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत २०२० नंतर तुकडे पडलेल्या व ४० आर पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या भूखंडांच्या रेखांकन व बांधकाम परवानगी मंजुरी प्रक्रियेमध्ये शासन नियमांचे उल्लंघन झाल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी केला आहे.

नगर विकास विभागाने दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ रोजी दिलेल्या शासन आदेशानुसार, २०२० नंतर ज्या भूखंडांचे तुकडे पडले आहेत व संबंधित क्षेत्र ४० आरपेक्षा जास्त आहे, अशा प्रकरणांमध्ये एकूण क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्र खुली जागा/आरक्षण म्हणून सोडणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. मात्र या महत्त्वाच्या तरतुदीकडे दुर्लक्ष करून अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये अनेक रेखांकन व बांधकाम परवानगी प्रकरणांना मंजुरी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर प्रकरणांमध्ये तत्कालीन मनपा आयुक्त श्री. पंकज जावळे
■ पान ४ वर

# भर पावसातही डॉ. सुजय विखे पाटील ग्राऊंडवर; विकासकामांचा घेतला आढावा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शिर्डी–** भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी सोमवारी सकाळी लोणी खुर्द व लोणी परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. कोल्हारनांदूर शिंगोटे महामार्गाच्या कामाची ग्रामस्थांसमवेत पाहणी करून कामाचा दर्जा, वाहतुकीची सुविधा आणि पावसाळ्यात नागरिकांना होणाऱ्या अडचणींचा आढावा घेतला. यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत कामात कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये, असे निर्देश त्यांनी दिले.

लोणी खुर्दयेथे सुरू असलेल्या महामार्गाचे व गटर बांधकामाचीही त्यांनी ग्रामस्थांसोबत पाहणी केली. नागरिकांनी मांडलेल्या विविध समस्या व सूचनांची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी भर पावसातही डॉ. सुजय विखे पाटील यांनी लोणी येथील एका पंक्चर दुकानातच जनता दरबार भरविला. मतदारसंघासह जिल्ह्याच्या विविध भागांतून



आलेल्या नागरिकांनी निवेदनांच्या माध्यमातून आपल्या समस्या मांडल्या. प्रत्येकाचे म्हणणे शांतपणे ऐकून संबंधित विभागांशी संपर्क साधत प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी तात्काळ सूचना दिल्या.

त्यानंतर कोल्हार येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामाचीही ग्रामस्थांच्या उपस्थितीत पाहणी करण्यात आली. तसेच कामातील त्रुटी निदर्शनास आणून देत संबंधित अधिकारी व ठेकेदारांना गुणवत्तापूर्ण आणि वेळेत काम पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्या. भर पावसातही प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन विकासकामांचा आढावा घेणे, नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देणे आणि कामांच्या गुणवत्तेबाबत ठाम भूमिका घेणे, यामुळे उपस्थित ग्रामस्थांनी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीचे स्वागत केले.

# माध्यमिक शिक्षक सोसायटीची ८३ वी वार्षिक सभा किरकोळ गोंधळ वगळता शांततेत

## ८ टक्के लाभांश उद्याच सभासदांच्या खात्यात जमा । थकबाकीदारांची नावे तालुकानिहाय जाहीर करणार; नामांतर, व्याजदर आणि ऑडिटवर रंगली जोरदार चर्चा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील सुमारे ११ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सभासदांची आर्थिक आधारवड असलेल्या अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सहकारी सोसायटीची ८३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. ५ जुलै) बुरुडगाव रोड येथील नक्षत्र लॉनमध्ये किरकोळ गोंधळ वगळता शांततेत पार पडली. तब्बल २२ वर्षांनंतर सत्तेवर आलेल्या स्वाभिमानी परिवर्तन मंडळाच्या कारकिर्दीतील ही दुसरी वार्षिक सभा ठरली. सभेत सोसायटीचे नामांतर, ठेवी व कर्जावरील व्याजदर, लाभांश, ऑडिटमधील तफावत आणि थकबाकी वसुली या विषयांवर जोरदार चर्चा झाली.

यावेळी चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी ऑडिटमध्ये तब्बल १५ कोटी रुपयांची तफावत आढळून आल्याचा गंभीर खुलासा करत हा प्रकार मागील संचालक मंडळाच्या कार्यकाळातील असल्याचा दावा केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर



कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. तसेच थकीत कर्ज वसुलीसाठी प्रत्येक तालुक्यातील संबंधित संस्थांमध्ये थकबाकीदारांची नावे फलकावर प्रसिद्ध करण्याचा निर्णयही संचालक मंडळाने घेतल्याची घोषणा करण्यात आली.

सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुनील दानवे, उमेश गुंजाळ, राजेंद्र कोतकर, सुधीर कानवडे, संभाजी गाडे, किशोर धुमाळ, आप्पासाहेब जगताप, बालाजी गायकवाड, छबू फुंदे, साहेबराव रकटे, शिवाजी लवांडे, बाजीराव अनभुले, अतुल कोताडे, विजय पठारे, सुरज घाटविसावे, वर्षा खिलारी, वैशाली दारकुंडे, उद्धव सोनवणे, सचिन जाधव, सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह माजी पदाधिकारी, संचालक आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी जिल्हा सहकारी मंडळाचे आर. पी. बचाटे यांनी सहकार कायदे, नियमावली, वार्षिक सभेचे महत्त्व व सहकार
■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक



नगर प्रांत ऑफिस बाहेरील वरदळीचा रस्ता असल्यामुळे हे पिंपळचे झाड कधीही पडू शकते शकते. यामुळे येथे येणाऱ्या - जाणाऱ्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. महापालिका कार्यालयाने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

## पाटेगावात कथित चक्री जुगाराचा सुळसुळाट; कारवाईची मागणी

**पैठण -** पैठण शहरालगतच्या पाटेगाव परिसरात कथितपणे चक्री जुगार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची तक्रार पुढे आली आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, पोलिसांनी तातडीने चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गावात चार ते पाच ठिकाणी हा जुगार सुरू असल्याचा दावा केला जात आहे. या जुगारासाठी पैसे उभे करण्याच्या उद्देशाने काही जण शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मोटारी व इतर साहित्याच्या चोरीकडे वळत असल्याचाही आरोप नागरिकांनी केला आहे. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगितले जात आहे.पाटेगाव परिसरात सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर जुगाराची पोलिसांनी सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी. तसेच जुगार सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करून हा प्रकार तातडीने बंद करावा, अशी मागणी नागरिक व शेतकरी करीत आहेत.

## पाथर्डीच्या भूषण नागापुरे यांचे पुण्यात २१ वे रक्तदान

**अहिल्यानगर-** समाजात नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे पाथर्डी येथील युवा सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसैनिक व संत वामनभाऊ तरुण मंडळाचे सदस्य भूषण नागापुरे यांनी पुणे येथे नुकतेच आपले



२१ वे यशस्वी रक्तदान नोंदवले आहे. पुणे येथील नऱ्हे गावचे लोकप्रिय *उपसरपंच अक्षयभाऊ इंगळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरामध्ये त्यांनी हे रक्तदान केले.भूषण नागापुरे यांच्या या सातत्यपूर्ण सामाजिक योगदानाबद्दल आयोजकांच्या वतीने *पाण्याचा जार, छत्र (छत्री) आणि तुळशीचे रोपटे देऊन त्यांचा विशेष सत्कार व सन्मान करण्यात आला.विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, अवघ्या १५ दिवसांपूर्वीच भूषण नागापुरे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल लोणावळा येथे राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. या पुरस्काराच्या पाठोपाठ त्यांनी उपसरपंचांच्या वाढदिवसानिमित्त २१ वे रक्तदान करून तरुणांसमोर एक आदर्श उभा केला आहे.

## अगस्ती महाविद्यालयात ५२ व्या वर्धापन दिन उत्साहात सोहळा

**अहिल्यानगर -** अगस्ती कला, वाणिज्य आणि दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाच्या ५२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आणि निसर्गाप्रती आपली जबाबदारी ओळखून, महाविद्यालयात नुकताच अत्यंत उत्साहात वन महोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या भव्य वृक्षारोपण मोहिमेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पर्यावरण रक्षणाचा संकल्प करत महाविद्यालयाचा ५२ वा वर्धापन दिन अतिशय अर्थपूर्ण पद्धतीने साजरा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी खेमनर यांनी भूषवले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती, अकोले येथील शिक्षण विभागाचे गणेश घोलप आणि विलास पठाडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली.

# कष्टकऱ्यांच्या पाठीशी लंके परिवार - राणीताई लंके

### १५० असंघटित बांधकाम कामगारांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर -** असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांच्या दैनंदिन गरजांना आधार देण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद सदस्या तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य राणीताई निलेश लंके यांच्या हस्ते १५० असंघटित बांधकाम कामगारांना विविध जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. कष्टकरी वर्गाच्या कल्याणासाठी सातत्याने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांपैकी हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला. लाभार्थी कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाधान व्यक्त केले.

असंघटित क्षेत्रातील कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन अधिकाधिक पात्र कामगारांपर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती आणि लाभ पोहोचविण्याबरोबरच त्यांच्या दैनंदिन जीवनाला हातभार लागावा, या उद्देशाने साहित्य वाटपाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी बोलताना राणीताई लंके म्हणाल्या, देशाच्या विकासात बांधकाम कामगारांचे योगदान अनन्यसाधारण आहे. उन्हा-पावसाची पर्वा न करता हे कामगार विकासाची पायाभरणी करतात. त्यामुळे त्यांच्या हक्काच्या योजना आणि सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचविणे हे आपले कर्तव्य आहे. कष्टकऱ्यांच्या पाठीशी लंके परिवार नेहमीच उभा राहिला आहे. कोणताही पात्र कामगार शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी पुढील काळातही सातत्याने प्रयत्न केले जातील.

खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, युवक आणि कष्टकरी कामगारांसाठी विविध लोककल्याणकारी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. आरोग्य, शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि कामगार कल्याण अशा विविध क्षेत्रांत लोकांपर्यंत प्रत्यक्ष मदत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात असून, साहित्य वाटपाचा हा उपक्रम त्याचाच एक भाग असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. बांधकाम कामगार मंडळाच्या माध्यमातून मिळणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी नोंदणीचे महत्त्व, आवश्यक कागदपत्रे आणि लाभ मिळविण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अधिकाधिक कामगारांनी नोंदणी करून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

जीवनावश्यक साहित्याचा लाभ मिळाल्याने उपस्थित कामगारांनी आनंद व्यक्त केला. वाढत्या महागाईच्या काळात अशा उपक्रमांमुळे कष्टकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळत असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. कामगारांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेत सातत्याने मदतीचा हात पुढे करणाऱ्या लोकप्रतिनिधींचे लाभार्थ्यांनी आभार मानले. कार्यक्रमास स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, बांधकाम कामगार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमाचे नियोजन आणि यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करत अशा लोकाभिमुख उपक्रमांचे स्वागत केले.

# नाथांची पालखी ७ जुलैला पैठणहून प्रस्थान; २४ जुलैला पंढरपूरात आगमन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण-** संत एकनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याला ७ जुलै रोजी पैठण येथून प्रारंभ होणार असून, २४ जुलै रोजी पालखी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. या पारंपरिक पालखी सोहळ्यात हजारो वारकरी सहभागी होणार असून, संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे.

यंदाच्या पालखी सोहळ्यात पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातून खडतर प्रवास करत पालखीचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. या प्रवासादरम्यान १९ मुक्काम आणि ५ रिंगण सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले असून, वारकऱ्यांच्या निवास, भोजन, आरोग्य व इतर मूलभूत सुविधांची तयारी संबंधित प्रशासन आणि स्थानिक समित्यांकडून करण्यात येत आहे.

नाथांच्या पालखी सोहळ्यामुळे मार्गावरील गावांमध्ये आधीपासूनच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पालखीच्या स्वागतासाठी विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. वारकरी मोठ्या श्रद्धाभावाने विठ्ठल नामाचा गजर करत पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार आहेत.

# निसर्गाशी नाते दृढ करणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी - न्यायाधीश पैठणकर

### वीस वर्षांची हरित परंपरा जपत ॲड. अनुराधा येवले यांचा वटसावित्री पौर्णिमेनिमित्त सात वडांची लागवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** वटसावित्री पौर्णिमेच्या पावन निमित्ताने गेली सलग वीस वर्षे सातत्याने सात वडांची झाडे लावण्याचा अनोखा आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या ॲड. अनुराधा येवले यांनी यंदाही हरित परंपरा जपत वृक्षलागवड केली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या न्यायाधीश जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेशजी सु. पैठणकर साहेब, अहिल्यानगर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.कृष्णा झावरे, ॲड. अनुराधा येवले, ॲड. स्वाती पाटील, ॲड. स्वाती नगरकर, ॲड. पल्लवी होनराव, ॲड. रुपाली पठारे, ॲड. शिल्पा बेरड, ॲड. सुरेश भोर, ॲड.रणजित गोरे, ॲड. सचिनदेवा पाठक, रविंद्र घोडके (अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) इंद्रजित जाधोर, विकास कर्डीले, अनिल निमसे, आतिष मिरपगार, बाळु कटारनवरे उपस्थित होते.

या प्रसंगी न्यायाधीश योगेश जी. पैठणकर म्हणाले की, भारतीय संस्कृतीतील वटसावित्री हा सण केवळ धार्मिक परंपरेपुरता मर्यादित नसून तो निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करणारा उत्सव आहे. अशा सणांचे सामाजिक आणि पर्यावरणीय महत्त्व ओळखून प्रत्यक्ष वृक्षलागवडीच्या माध्यमातून समाजाला प्रेरणा देणे ही काळाची गरज आहे. ॲड. अनुराधा येवले यांनी गेली वीस वर्षे अखंडपणे हा उपक्रम सुरू ठेवला आहे, ही बाब अत्यंत कौतुकास्पद असून त्यातून समाजात पर्यावरण संरक्षणाची सकारात्मक जाणीव निर्माण होत आहे.

अहिल्यानगर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, वकील हा केवळ न्यायालयापुरता मर्यादित नसून समाजप्रबोधनाची भूमिकाही प्रभावीपणे पार पाडत असतो. पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने काम करणाऱ्या ॲड. अनुराधा येवले यांनी वीस वर्षांची अखंड परंपरा निर्माण करून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. अशा उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते आणि पुढील पिढ्यांमध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक संस्कार घडतात, असे त्यांनी नमूद केले.

ॲड. स्वाती पाटील म्हणाले की, वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि घटणारे हरित क्षेत्र या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. एका झाडाची लागवड म्हणजे भविष्यातील अनेक पिढ्यांना शुद्ध हवा, सावली आणि पर्यावरणाचे संरक्षण देण्याचे कार्य होय.

ॲड. स्वाती नगरकर म्हणाले की, न्यायव्यवस्थेप्रमाणेच समाजाप्रती असलेली आपली नैतिक जबाबदारीही प्रत्येकाने अशा विधायक उपक्रमांतून पार पाडली पाहिजे. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांचे त्यांनी अभिनंदन करून अशा उपक्रमांची व्याप्ती अधिक वाढावी, अशी भावना व्यक्त केली.उपक्रमाच्या प्रमुख प्रेरक ॲड. अनुराधा येवले यांनी सांगितले की, वटसावित्री पौर्णिमेचे धार्मिक महत्त्व जपत त्याला पर्यावरण संरक्षणाची जोड देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला. गेली वीस वर्षे दरवर्षी सात वडांची झाडे लावण्याचा संकल्प अखंड सुरू असून या वृक्षांचे संवर्धन करण्यालाही तितकेच महत्त्व दिले जाते. समाजातील प्रत्येक कुटुंबाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाची मोठी चळवळ उभी राहू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# चार दिवसांत जायकवाडीत १४ हजार द.ल.घ.मी. पाण्याची भर

### पाणलोट क्षेत्रातील पावसामुळे नाथसागरच्या साठ्यात वाढ; उपयुक्त पाणीसाठा २८.१३ टक्क्यांवर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण-** जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे नाथसागर जलाशयातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. अवघ्या चार दिवसांत धरणात सुमारे १४ हजार दशलक्ष घनमीटर (द.ल.घ.मी.) पाण्याची भर पडली असून, धरणातील उपयुक्त पाणीसाठा २८.१३ टक्क्यांवर पोहोचला आहे.

यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झाल्याने जायकवाडीतील पाणीसाठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. मात्र, पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे धरणात पाण्याची आवक वाढू लागली आहे. जलाशय परिसरातही रिमझिम पाऊस सुरू असून, वरच्या भागात पावसाचा जोर कायम राहिल्यास येत्या काही दिवसांत पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या कृषी सिंचनासाठी जायकवाडी धरणातून पाणी सोडणे बंद आहे. मात्र, धरणातून २५३ गावांतील सुमारे ५५ लाख नागरिकांना नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. तसेच सहा औद्योगिक वसाहती, आठ साखर कारखाने आणि हजारो उद्योगांना स्वतंत्र जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या सूत्रांनी दिली. पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस कायम राहिल्यास नाथसागर जलाशयातील पाणीसाठ्यात आगामी काळात आणखी वाढ होईल, असा विश्वास जलसंपदा विभागाने व्यक्त केला आहे.

## बालिकाश्रम रस्त्यावरील परिसर ग्रुपच्या वतीने वृक्षारोपण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** वृक्ष लावून त्याच संवर्धन करणे हि काळाची गरज असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हे अतिशय गरजेचे असल्याचे प्रतिपादन नगरसेवक महेश लोंढे यांनी केले,अहिल्यानगरचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपमहापौर धनंजय जाधव याच्या संकल्पनेतून एक लाख वृक्ष लागवडीचा एक भाग म्हणून बालिकाश्रम रस्त्यावरील गीते हॉस्पिटल मागील सर्व परिसरातील(वार्ड-नंबर ९ ) नागरिकांच्या पुढाकारातून नगरसेवक महेश लोंढे व अभिजित बोरुडे यांच्या हस्ते विविध मोकळ्या जागेमध्ये वृक्षांची लागवड रविवारी करण्यात आली याप्रसंगी लोंढे बोलत होते. विकासाच्या कामामध्ये नेहमीच आमचे सहकार्य राहील असे आश्वासन लोंढे यांनी देऊन परिसरातील नागरिकांनी पावसाळा सोडून नियमित पणे या वृक्षांचे सैवर्धनाची जबाबदारी घ्यावी असे सांगून या उपक्रमास शुभेच्छा दिल्या हे वृक्षारोपण पाठक मळा ,अरबेला अपार्टमेंट व परिसरातील सर्व कॉलोनीमध्ये करण्यात आले यावेळी परिसराची स्वछता.पाणी,व इतर व्यवस्था कायम संभाळणारे जोशी काका,नगरसेवक महेश लोंढे ,समाजसेवक अभिजीत बोरुडे यांचा विशेष सत्कार परिसराच्या वतीने करण्यात आला.याप्रसंगी सतीश बंड,चंद्रकांत पुंड ,सर्वश्री श्री व सौ तांबोळी,कांकरिया,घोडके,परदेशी, मालपाणी,गौरव पारखे,अनिल शाह ,शितोळे सर,मयूर भाऊ,उबाळे सर, चेमटे,श्री व सौ पटारे ,शिवराये,कुलकर्णी,सावंत,ठुबे सर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार विलास पाटील भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त पैठण पोलिसांना रेनकोटचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण-** पैठणचे आमदार विलास पाटील भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांतर्गत पैठण पोलीस ठाण्यात पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी आमदार विलास पाटील भुमरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. पावसाळ्यात कर्तव्य बजावताना पोलिसांना रेनकोटचा उपयोग होणार असल्याने या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच आमदार विलास पाटील भुमरे यांचे समर्थक व पदाधिकारी उपस्थित होते.

# वृक्षारोपणातून मुख्याध्यापकपदाचा पदभार स्वीकार; बाबासाहेब बोडखे यांचा प्रेरणादायी उपक्रम

### पंडित नेहरू हिंदी विद्यालयात शिक्षकांकडून मुख्याध्यापक बाबासाहेब बोडखे यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नव्या जबाबदारीची सुरुवात करण्याचा प्रेरणादायी आदर्श माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी घालून दिला. भुईकोट किल्ला परिसरातील पंडित नेहरू हिंदी विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांनी औपचारिक पदभार स्वीकारण्यापूर्वी शाळेच्या परिसरात विद्यार्थी व शिक्षकांसमवेत वृक्षारोपण केले. वृक्षारोपणातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत त्यांनी आपल्या नवीन कार्याची सुरुवात केली.

यावेळी शालेय शिक्षक गोपीचंद परदेशी, कमल भोसले, कविता जोशी, वैभव शिंदे, मोनिका मेहतानी, शिल्पा पाटीळे, परीक्षित सुने, नूतन गाडे, पिंकी वैद्य, मोनिका साळुंके, ठाकूरदास परदेशी, योगेश गायकवाड यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाबासाहेब बोडखे यांनी याच विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत असताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सातत्याने उल्लेखनीय काम केले आहे. विशेषतः विविध राज्यांतून आलेल्या हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्या भाषिक अडचणी दूर व्हाव्यात आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असून विद्यालयाच्या गुणवत्तेतही वाढ झाली आहे.

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच खरे शिक्षण या भूमिकेतून त्यांनी सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविले. शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारीही विद्यार्थ्यांमध्ये वाटून दिली. त्यामुळे पर्यावरणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

सामाजिक बांधिलकी जपत बोडखे दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करतात. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आधार बनण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनात्मक नेतृत्व अशा विविध भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांच्या या सर्वांगीण कार्याची दखल घेत त्यांची पंडित नेहरू हिंदी विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी नियुक्ती करण्यात आली. पदभार स्वीकारल्यानंतर शाळेतील शिक्षकांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

मुख्याध्यापक बाबासाहेब बोडखे म्हणाले की, वृक्ष म्हणजे जीवन, संस्कार आणि भविष्य. जसे एका रोपट्याचे संगोपन केल्यावर ते मोठे वृक्ष बनते, तसेच विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सकारात्मक विचारांचे सिंचन केले तर ते देशाचे सक्षम नागरिक बनतात.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)


## दै. आकर्षण निवडक

### अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. फारूक बिलाल शेख



अहिल्यानगर- अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या बैठकीदरम्यान ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. फारूक बिलाल शेख यांची अध्यक्षपदी निवड झाली. या बैठकीसाठी बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी, ॲड. विश्वासराव आठरे पाटील, ॲड. पिंगळे, ॲड. ए.डी. चौधरी, ॲड. सुभाष काकडे, ॲड. के.एम. देशपांडे, ॲड. बिहाणी व इतर वकील बांधव उपस्थित होते.निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना ॲड. फारूक बिलाल शेख यांनी बार असोसिएशनच्या सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. सदस्यांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत वकिलांच्या हिताचे रक्षण, बार आणि बेंच यांच्यात समन्वय वृद्धिंगत करणे, तरुण वकिलांना प्रोत्साहन देणे, न्यायालयीन सुविधा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे तसेच बार असोसिएशनच्या सर्वांगीन विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही त्यांनी दिली.या निवडीबद्दल न्यायालयीन व विधी क्षेत्रातील मान्यवर, सहकारी वकील तसेच विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. ॲड. फारूक बिलाल शेख यांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशन अधिक सक्षम, सक्रिय व प्रगतिशील पध्दतीने वाटचाल करेल असा विश्वास विधी क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

### ...गुरुजी बाह्य कामात व्यस्त, प्रश्न गुणवत्तेचा..?



शिक्षण क्षेत्रातील शिक्षक वर्गाची व्यथा आणि विद्यार्थी वर्गाची गुणवत्ता याबाबत चर्चा बरीच होते. परंतु प्रश्न तसाच ''आ '' वासून पुन्हा उभा राहिलेला दिसून येतो. नुकतीच बातमी पाहिली गुन्ह्यांच्या तपासासाठी शिक्षक यांची पंच म्हणुन नियुक्ती केली . यापूर्वीच यांना निवडणुकीची,मतदार छाननी,बीएलओ ,विविध सर्व्हे इ.शाळाबाह्य कामे,त्यात भर म्हणून पंचाचे काम देण्यात आले.त्यात जर इयत्ता १ ते ७ वी शाळा असली तर अधीच कमी शिक्षक,त्यातही एक दोन बाहेर,कसा अभ्यासक्रम पूर्ण होईल..? कशी विद्यार्थी वर्गाची गुणवत्ता वाढेल हा प्रश्न निर्माण होतो. याचे परिणाम आपण पाहतो, महापालिका, पालिका, जिल्हा परिषदेच्या शाळा एकतर बंद होत आहेत किंवा विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. शिक्षक नसल्याचे पालकांच्या हि निदर्शनास आल्याने खाजगी शाळा कडे पालक आपल्या पाल्यांना प्रवेश घेत आहेत. यावर उपाय एकच आहे कि, शासनाने शाळाबाहय कामाकरिता एक ''बाह्य शिक्षक'' हे नवीन पद निर्माण करावे. म्हणजे सर्व शाळाबाह्य काम हा नवीन पदावरील शिक्षक करेल.मग त्यांना निवडणुकीचे,पोलिसांनी नेमलेल्या पंचाचे,कार्यालया बाहेरील कामे द्यावीत,म्हणजे उर्वरित शिक्षकांना विद्यार्थी वर्गाच्या गुणवत्ते कडे लक्ष देता येईल.

**रफिक मुन्शी**, अहिल्यानगर.

### श्री मधुकर सोनाजी खोमणे यांचे निधन



अहिल्या नगर - केकती येथील प्रगतशील शेतकरी तसेच प्रियदर्शनी पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज चे संस्थापक अध्यक्ष श्री बाळासाहेब खोमणे यांचे वडील आणि जुन्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते श्री मधुकर सोनाजी खोमणे यांचे अल्पशः आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांचे पश्चात मुलगी सुनिता पांडुरंग साठे तसेच पत्नी व सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. केकती व परिसरात ते नाना या नावाने सुपरिचित होते प्रियदर्शनी स्कूलच्या आजपर्यंतच्या यशामध्ये त्यांचे कार्य उल्लेखनीय होते त्यामुळे त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मनोज जाधव: संघर्षाच्या मातीतून उमललेला कृषिरत्न!

''काही माणसांचा जन्म हा फक्त स्वतःसाठी नसतो; ते समाजासाठी जन्माना येतात. त्यांचे आयुष्य हे संघर्ष, कर्तृत्व आणि प्रेरणेचे जिवंत विद्यापीठ असते.''

कृषिरत्न पुरस्काराचे मानकरी श्री. मनोज जाधव यांची कहाणी ही अशाच एका असामान्य आणि वादळी व्यक्तिमत्त्वाची आहे.

बालपण आणि खडतर संघर्ष: यमुना माईचा यशोदा मायेचा पदर

सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील छोट्याशा कुसगांवात २३ ऑक्टोबर १९८१ रोजी एका गरीब शेतकरी कुटुंबात मनोज जाधव यांचा जन्म झाला. जन्मापासूनच नियतीने त्यांची कठोर परीक्षा सुरू केली. आईचा चेहरा कधी पाहायलाही मिळाला नाही आणि वडिलांचेही प्रेम लाभू शकले नाही. व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या कौटुंबिक परिस्थितीमुळे बालपण हरवले. पण जिथे अनेकजण परिस्थितीसमोर हार मानतात, तिथे मनोज यांनी संघर्षालाच आपली ताकद बनवले.

आई-वडिलांची उणीव त्यांचे चुलते कै. आनंदराव जाधव आणि चुलती स्व. यमुना आई यांनी भरून काढली. जन्मदात्री आई सुमन देवकी असली, तरी यमुना जाधव यांनी यशोदेप्रमाणे त्यांचे संगोपन केले. तीन बहिणींनंतरचा हा एकुलता एक मुलगा! आनंदरावांना नेहमी वाटायचे, ''हा मुलगा एक दिवस जाधव घराण्याचे नाव मोठे करणार.'' आज त्यांचा तो विश्वास अक्षरशः खरा ठरला आहे.

आखाडा ते क्रिकेटचे मैदान: नेतृत्वाची पहिली ठिणगी

वडील त्या काळचे नामांकित मल्ल होते, त्यांचा हा कुस्तीचा वारसा मनोज यांनी बालपणीच पुढे चालवला. शरीराने सामान्य, पण मनाने प्रचंड ताकदवान असलेले मनोज जाधव पंचक्रोशीत नावाजलेले कुस्तीपटू ठरले. त्यानंतर क्रिकेटमध्येही सातारा जिल्ह्यातील एक उत्कृष्ट गोलंदाज म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.




त्यांच्या नेतृत्वाची झलक लहानपणापासूनच दिसत होती: एकदा क्रिकेटचा चेंडू गटारात गेला, म्हणून त्यांनी संपूर्ण गावात नाले स्वच्छतेची मोहीम उभारली आणि तरुणांना एकत्र केले.

नेहरू युवा मंडळाच्या माध्यमातून गावातील सामाजिक व शैक्षणिक कामांत पुढाकार घेतला.

''नेतृत्व म्हणजे पद नव्हे, तर कृती असते'' हे त्यांनी बालवयातच सिद्ध केले.

कृषी शिक्षणाची वाट आणि कृषी कांचनचा उदय

घरच्यांच्या सल्ल्याने त्यांनी कृषी शिक्षणाचा मार्ग निवडला. शिक्षण पूर्ण होताच कर्जत येथे एका मंदिरात राहून, अत्यंत कमी पगारात केवळ शिकण्याच्या उद्देशाने एका कृषी कंपनीत कामाची सुरुवात केली. औषधे, कीड, रोग, माती आणि बियाणे व्यवस्थापन यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. अवघ्या दीड वर्षांत फील्ड असिस्टंटपासून ते झोनल मॅनेजरपर्यंतचा त्यांचा प्रवास त्यांच्या कष्टांची साक्ष देतो.

यानंतर सातारा येथे त्यांनी ''कृषी कांचन''या दुकानाच्या माध्यमातून स्वतःचा कृषी व्यवसाय सुरू केला.

प्रामाणिकपणा आणि शेतकऱ्यांप्रती असलेली आत्मीयता यामुळे ते अल्पावधीतच यशस्वी कृषी उद्योजक बनले.

मात्र, त्यांना केवळ औषधे विकणारा व्यापारी बनायचे नव्हते, तर एक विश्वासार्ह सल्लागार व्हायचे होते. आज स्ट्रॉबेरी, आंबा, अव्हकॅडो या फळपिकांचे सल्लागार म्हणून देशपातळीवर त्यांचे मोठे नाव आहे.

शासकीय सेवा: पगारापेक्षा जास्त कामाचा ध्यास!

सन २००७ मध्ये त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागात प्रवेश केला. त्यांच्यासाठी ही सरकारी नोकरी केवळ रोजगार नव्हती, तर ती समाजसेवेची सुवर्णसंधी होती. ''पगारापेक्षा जास्त काम करायचे'' हा त्यांचा जीवनमंत्र बनला.

महत्त्वाचे उपक्रम आणि योगदान (२००७ ते २०२३):

आत्महत्याग्रस्त भागात कार्य:* नोकरीच्या सुरुवातीलाच त्यांनी विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील अंजनखेड, सारी, राणीधानोरा यांसारख्या संवेदनशील भागात जलसंधारणाची मोठी कामे उभी केली.

जलकुंड संकल्पना: कोकणातील कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी त्यांनी सुचविलेली जलकुंड ही अभिनव संकल्पना आज संपूर्ण कोकणात अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे.

भातशेती पुनरुज्जीवन:* पोलादपूर तालुक्यात सामुदायिक शेती, जलयुक्त शिवार आणि राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले.

सर्वोच्च बहुमानाचा क्षण: कृषिरत्न पुरस्कार!

या संपूर्ण प्रवासात त्यांना कृषी संचालक विकास पाटील, उज्ज्वला बाणखेले मॅडर, बालाजी ताठे, कैलास धुमाळ, गुरु प्रदीप साबळे, मच्छिंद्र मगर, विठ्ठलराव बंडे, अशोक भरगुडे, बंधू सुनील जाधव आणि मित्र दत्ता नरुटे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या प्रामाणिक परिश्रमांचे फळ म्हणून मनोज जाधव यांना महाराष्ट्राचा सर्वोच्च कृषी सन्मान ''पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न२०२३ (कृषिरत्न)'' जाहीर झाला. राज्यपालांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारताना, ज्याला घरात प्रेमाने सगळे तात्या म्हणतात, त्या तात्यांच्या डोळ्यांत समाधान होते आणि संपूर्ण कुटुंबाच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू होते.

श्री. मनोज जाधव यांच्या भावना:

''हा सन्मान मी राज्यातील सर्व कष्टकरी शेतकरी बांधवांना समर्पित करतो. माझे स्वप्न इथेच संपत नाही; मला संपूर्ण भारतात विषमुक्त शेती फुलताना पाहायची आहे.''

एक नितांत निष्ठा...

ते नेहमी एक वाक्य आत्मविश्वासाने सांगतात:

''ज्या दिवशी मी स्वतः शेती करेन, त्या दिवशी ती शेती देशातील सर्वोत्कृष्ट शेती असेल.''

मनोज जाधव यांची कहाणी ही केवळ एका पुरस्काराची कथा नाही; ती प्रतिकूल परिस्थितीवर मात करणाऱ्या आणि आयुष्यभर शेतकऱ्यांच्या हितासाठी झटणाऱ्या एका खऱ्या कर्मयोग्याची प्रेरणागाथा आहे! खऱ्या अर्थाने, मनोज जाधव यांच्यासारख्या निस्वार्थ कर्मयोग्यामुळे या कृषिरत्न पुरस्काराची प्रतिष्ठा अधिक वाढली आहे.

संकलन
**शिरीष नामदेव गवळी**
(जनसंपर्क अधिकारी, सातारा)

# मनसे शेवगाव तालुका बैठक संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शासकीय विश्रामगृह येथे मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका आढावा बैठक संपन्न झाली असून यावेळी आखातवाडे येथील अक्षय बडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मनसे पक्षात प्रवेश केल्याचे मनसे तालुकाध्यक्ष मंगेश पाखरे यांनी सांगितले.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे म्हणाले की शेवगाव तालुक्यात येत्या काळात मनसेची पक्ष बांधणी करण्यात येणार असून आगामी पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका लढवण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू करा जनहिताचे आंदोलने करा लवकरच शहरांमध्ये शहराध्यक्ष नेमणूक करून संपूर्ण शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार आहे यावेळी आखतवाडे येथील अक्षय बडे यांच्यासह अनेक तरुणांनी मनसे पक्षात प्रवेश केला यावेळी शेवगाव तालुक्यामध्ये पंचायत समिती गण व जिल्हा परिषद गट याप्रमाणे विभाग अध्यक्ष उपविभाग अध्यक्ष गण अध्यक्ष अशा नेमणुका लवकरात लवकर करण्याच्या सूचना पालवे यांनी तालुकाध्यक्ष पाखरे यांना दिल्या.

या बैठकीस शेवगाव तालुका अध्यक्ष मंगेश पाखरे, पाथर्डी तालुका अध्यक्ष संतोष जिरेसाळ, शायद शेख, विजय सागडे पाटील, संभाजी केदार, बाळासाहेब वाघ, अण्णासाहेब काळे यांसह असंख्य महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# कान्हूर पठारचा श्रीयांश राष्ट्रीय किकबॉक्सिंगचा दुहेरी सुवर्णविजेता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मध्यप्रदेशातील इंदोर येथे १७ ते २१ जून २०२६ या कालावधीत पार पडलेल्या सब ज्युनियर राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत पुणे येथे स्थायिक असलेल्या कान्हूर पठार येथील श्रीयांश जयश्री शशिकांत तिरखुंडे याने २७ किलो गटातील किक लाईट आणि ग्रुप पॉईट या प्रकारांमध्ये दमदार खेळाचे प्रदर्शन करत दोन सुवर्णपदकांची कमाई केली. या उल्लेखनीय यशामुळे पुणे तसेच कान्हूर



पठार परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्रीयांशला पुणे येथील योद्धा मार्शल आर्ट्स अँड स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रशिक्षक श्री. रामप्रसाद सोनुने तसेच किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन (महाराष्ट्र)चे अध्यक्ष श्री. निलेश शेलार, नेहा धनरिया आणि स्नेहल बोरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेत अकॅडमीच्या इतर अनेक खेळाडूंनीही सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची इटलीतील व्हेनिस येथे होणाऱ्या वर्ल्ड किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी निवड करण्यात येणार असून, आगामी जागतिक स्पर्धेत भारतीय खेळाडू देशाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# आ. दातेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत अळकुटी परिसरातील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्याच्या वायव्य भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला आज नवे बळ मिळाले. विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अळकुटी व परिसरातील विविध कार्यकर्त्यांनी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुका उपाध्यक्षा सौ. रेश्माताई मच्छिंद्र गलांडे आणि तालुका उपाध्यक्ष सुरेश परंडवाल यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात आसिफ मोमीन, राजू पारखे, अभय शित्रे, राजेंद्र शिरोळे, राजेंद्र बोरुडे, गणेश शित्रे, अयुब मोमीन, नवनाथ गाडगे, सलीम मोमीन, सोहेल मोमीन, आयान मोमीन, अस्लम शेख आणि इकबाल आतार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा हाती घेत पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त केला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ''राष्ट्रवादी काँग्रेस हा सामान्य माणसाच्या आशा- आकांक्षांचा पक्ष आहे. जनतेचा विश्वास आणि विकासाचे राजकारण हीच आमची खरी ताकद आहे. अळकुटी परिसरातील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आज पक्षात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान राखत जनतेच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने काम करू.

कार्यक्रमास पारनेर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, नगरसेवक अशोक चेडे, पारनेर शहर उपाध्यक्ष सुनिल गाडगे, मच्छिंद्र गलांडे, सुखदा परंडवाल, गणेश गलांडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अळकुटी व परिसरातील या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनात्मक ताकद वायव्य भागात अधिक भक्कम झाल्याचे मानले जात आहे. स्थानिक पातळीवर विकासाच्या मुद्द्यांवर जनतेचा वाढता विश्वास आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण जनसंपर्कामुळे विविध स्तरांतील कार्यकर्ते पक्षाशी जोडले जात आहे. आगामी काळात या भागात राष्ट्रवादी काँग्रेसचा जनाधार आणखी मजबूत होईल.

> **अळकुटी आणि परिसरातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दाखवलेला विश्वास आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख, सर्वसमावेशक आणि जनतेशी नाळ जोडलेल्या नेतृत्वामुळे आज अनेक युवा आणि ज्येष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने पक्षात सहभागी होत आहेत. वायव्य भागातील प्रत्येक गावाच्या विकासासाठी आम्ही संघटनेच्या माध्यमातून अधिक ताकदीने काम करू. जनतेचा विश्वास हीच आमची खरी ताकद असून, तो कायम राखण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.**
>
> – **रेश्माताई गलांडे** (राष्ट्रवादी काँग्रेस महिला तालुका उपाध्यक्षा)

### प्रेमाच्या जाळ्यात पाच वर्षे अडकवून लग्नाचे आमिष-शारीरिक संबंध आणि

# १३ लाखांसह ३ तोळे सोनं घेतल्याची धक्कादायक घटना..!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शिर्डी–** शिर्डीत प्रेमसंबंधाच्या आडून एका तरुणीची तब्बल पाच वर्षे मानसिक, आर्थिक आणि शारीरिक फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लग्नाचे गोड आश्वासन देत विश्वास संपादन केला, वारंवार शारीरिक संबंध ठेवले, त्यानंतर लाखो रुपयांची रक्कम आणि सोनं घेत अखेर लग्नालाच नकार दिल्याचा गंभीर आरोप एका २९ वर्षीय तरुणावर करण्यात आला आहे.

या प्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे शिर्डी पोलीसांकडे दाखल झालेल्या तक्रारीनुसार, जून २०२१ ते जून २०२६ या कालावधीत आरोपीने पीडित तरुणीला लग्नाचे आश्वासन देत शिर्डीतील जोशी हॉस्पिटल जवळ असलेल्या हॉटेल एस.एस. पॅलेस येथे वेळोवेळी बोलावून तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, लग्न निश्चित होणार असल्याचा विश्वास निर्माण करून आरोपीने पीडितेकडून वेळोवेळी सुमारे १३ लाख रुपये रोख रक्कम तसेच ३ तोळे सोनं घेतले. मात्र, अनेक वर्षे आश्वासने देऊनही आरोपीने लग्न करण्यास नकार दिला.

तसेच रक्कम आणि सोनं परत देण्यासही टाळाटाळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. फसवणूक झाल्याची खात्री झाल्यानंतर पीडित तरुणीने अखेर शिर्डी पोलीस ठाण्यात धाव घेत न्यायाची मागणी केली. या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ५८९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () २०२३ मधील कलम ३१६(२) आणि ६९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून संबंधित आरोपीचा शोध आणि पुरावे संकलित करण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

# अमली पदार्थमुक्त समाजासाठी पैठणमध्ये जनजागृती अभियान

### प्रतिष्ठान महाविद्यालयात विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** युवकांनी अमली पदार्थांपासून दूर राहून निरोगी व सुरक्षित भविष्य घडवावे, या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या अमली पदार्थविरोधी अभियानांतर्गत पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे पैठण आणि अमली पदार्थविरोधी पथकाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यांचा आरोग्य व सामाजिक जीवनावर होणारा विपरीत परिणाम तसेच व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ''   '' हा संदेश देत अमली पदार्थांना ठाम नकार देण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालय परिसरात जनजागृतीपर फलकही लावण्यात आले. पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एपीआय पवार, पीएसआय खंडागळे, हेड कॉन्स्टेबल गायकवाड, पवार, घुले, भालेराव तसेच प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या उपक्रमातून ''अमली पदार्थमुक्त समाज, सुरक्षित भविष्य'' घडविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# अर्जुनाच्या ध्येयासारखे लक्ष्य ठेवा ; मातृभाषेतून शिक्षण आणि नैसर्गिक जीवनशैलीचा स्वीकार करा - डॉ. सुनील गंधे

### भाग्योदय विद्यालयात शिक्षक-पालक संघाची स्थापना; विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांच्या सक्रिय सहभागाचे आवाहन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक-पालक संघाची स्थापना उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या कार्यक्रमाला आदर्श गावचे सरपंच डॉ. सुनील गंधे, संस्थेचे ज्येष्ठ संचालक रघुनाथ लोंढे, विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, मुख्याध्यापक बन्सी नरवडे, पालक प्रतिनिधी अरविंद मैड, भावना शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सुनील गंधे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शालेय प्रार्थनेचे महत्त्व अधोरेखित केले. ''दररोज घेतली जाणारी प्रार्थना विद्यार्थ्यांची एकाग्रता, मनोबल आणि सकारात्मक विचार वाढविण्यास उपयुक्त ठरते. शिक्षणकार्य ही देवसेवाच असून ते श्रद्धा, निष्ठा आणि समर्पणातून केले पाहिजे,'' असे ते म्हणाले. भगवद्गीतेतील श्लोकांचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांनी अर्जुनाप्रमाणे आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून स्पर्धा परीक्षांचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन केले.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी सकस आहार, फळे, भाजीपाला, कडधान्ये, नियमित व्यायाम आणि क्रीडा यांचे महत्त्व विशद केले. सूर्यप्रकाशाचा योग्य उपयोग केल्यास सांधेदुखी व गुडघेदुखीसारख्या समस्या टाळता येतात. औषधांवरील अवलंबित्व कमी करून नैसर्गिक जीवनशैली स्वीकारण्याचा सल्लाही त्यांनी दिला. ''मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास ज्ञान अधिक प्रभावीपणे आत्मसात होते. इंग्रजी ही आपली मातृभाषा नसून आपली संस्कृती, ग्रंथ आणि परंपरा मातृभाषेतच आहेत. शिकवणे हे एक शास्त्र असून शास्त्रशुद्ध पद्धतीने शिक्षण झाले तरच शिक्षण प्रक्रिया परिपूर्ण होते,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करताना शाळा हे ज्ञानमंदिर असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून शिक्षणात सातत्य ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कुसुमाग्रजांच्या ''पाऊस आला चिखल झाला, कशाला जाता दूर गड्यांनो इथेच पंढरपूर'' या कवितेचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांनाच दैवत मानून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. या उपक्रमांना पालकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय रेणुका माता विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे यांनी करून दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब कोतकर, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, संतोष काकडे, शिवाजी धस, सौ. रूपाली शिंदे, सुनिता मेढे, आदिनाथ ठुबे तसेच कनिष्ठ विद्यालयातील प्रा. गोविंद कदम, गोरक्ष कांडेकर, एकनाथ होले, दत्तात्रय पांडुळे, गणेश गायकवाड, बाळासाहेब कावरे, सुधा गायकवाड, वैष्णवी जगताप आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल! श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांचा गुन्हेगारांना कडक इशारा

### १२१ अट्टल गुन्हेगारांचे भरून घेतले इंट्रोगेशन फॉर्म; २ लाखांचे लिहून घेतले बंधपत्र

**दैनिक आकर्षण । कमलेश गायकवाड**

**नेवासा–** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा कमालीची ॲक्टिव्ह झाली आहे. अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मा. श्री. मुम्मका सुदर्शन (भा.पो.से.)यांच्या आदेशान्वये श्रीरामपूर विभागामध्ये गुन्हेगारांचे चांगलेच कान टोचण्यात आले आहेत.

अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे यांनी गुन्हेगारांना थेट आणि कडक शब्दांत इशारा दिला आहे की, ''कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल, आणि कायदा तोडून जर पुन्हा गुन्हेगारी करण्याचा प्रयत्न केला, तर पोलीस प्रशासन खाकीची कडक ताकद दाखवेल!''

**१३ पोलीस ठाण्यांमधील १२१ आरोपींची परेड**

श्रीरामपूर अधीनस्थ (उत्तर अहिल्यानगर) भागातील तब्बल १३ पोलीस स्टेशन मधील खून, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, आणि आर्म ॲक्ट सारख्या गंभीर गुन्ह्यातील १२१ रेकॉर्डवरील गुन्हेगारांना अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर करण्यात आले होते. या विशेष मोहिमेदरम्यान सर्व आरोपींची ओळख परेड घेण्यात आली आणि त्यांचे कुटुंब, राहण्याचे ठिकाण, वापरत असलेली वाहने आणि मोबाईल नंबर अशी सर्व माहिती इंट्रोगेशन फॉर्म मध्ये नोंदवून घेण्यात आली.



**पुन्हा गुन्हा केल्यास २ लाखांचा दंड आणि थेट जेल!**

भारतीय नागरिक संहिता कलम १२९ अन्वये कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या पुढे सर्व गुन्हेगारांकडून प्रत्येकी *२ लाख रुपयांचे बंधपत्र (बॉण्ड)* लिहून घेण्यात आले आहे. पुढील २ वर्षांच्या कालावधीत जर या आरोपींनी कोणताही गुन्हा केला, तर त्यांच्याकडून हे २ लाख रुपये वसूल करून थेट न्यायालयीन कोठडीत (जेलमध्ये) रवानगी केली जाईल, अशी तंबी देण्यात आली आहे.

**गुन्हेगारांना देण्यात आलेल्या कडक समज:**

१) जामीन रद्द होणार: पुन्हा गुन्हा केल्यास पूर्वीच्या गुन्ह्यातील जामीन तातडीने रद्द केला जाईल.

२) तडीपार आणि मकोका:* सुधारण्याची संधी न घेता पुन्हा गुन्हेगारी वळणावर गेल्यास थेट तडीपार किंवा मकोका () सारखी कडक कारवाई केली जाईल.

३) सोशल मीडियावर भाईगिरी बंद:* सोशल मीडियावर भाईगिरी किंवा दहशत पसरवणारे व्हिडिओ शेअर करणाऱ्यांवर कडक पाळत ठेवली जाईल.

४) दर मंगळवारी हजेरी: सर्व आरोपींना पुढील ६ महिने दर मंगळवारी सकाळी ११.०० वाजता अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयात हजेरी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली धडक मोहीम**

सदरची धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर(श्रीरामपूर), कुणाल सोनवणे (संगमनेर), अमोल भारती(शिर्डी), आणि निरज राजगुरु*(शेवगाव) यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली. पोलीस प्रशासनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे गुन्हेगार गोटात प्रचंड खळबळ उडाली असून, नागरिकांमधून या कारवाईचे स्वागत होत आहे.

## आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

### देवदैठण शाळेला ढोल-लेझीम संच भेट तर ढवळगाव येथे वृक्षारोपण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील येळपणे गटात देवदैठण व ढवळगाव येथे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

देवदैठण येथे अनिल बनकर मित्र परिवाराच्या वतीने संत निंबराज विद्याधाम प्रशालेच्या विद्यार्थ्यांसाठी ढोल व लेझीम संच भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच पारंपरिक लेझीम सरावासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले असून उपस्थितांनी उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी निलेश गायकवाड, तुषार वाघमारे, रोहित बनकर, मुख्याध्यापक पोपटराव मेरगळ, प्रमोद रूपनर, मनोहर परदेशी, निवृत्ती वेताळ, राजेंद्र जगताप, संदीप घावटे, शंकर गाडीलकर, गणेश वाजे, सतिष झांबरे आदींसह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच ढवळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित उपक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करत माजी सरपंच रवींद्र शिंदे, माजी उपसरपंच अजय वाळुंज, पाणी वापर संस्था समितीचे सदस्य पांडुरंग ढवळे, माजी ग्रामपंचायत सदस्य अमोल बोरगे आदींनी पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला. यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वडघुल परिसरात बिबट्याची दहशत; वन विभागाची मोहीम युद्धपातळीवर, नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील वडघुल परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरुवातीला वाडी-वस्त्यांपुरता मर्यादित असलेला बिबट्या आता थेट गावात प्रवेश करत असून कोंबड्या व लहान पाळीव जनावरांवर हल्ले करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

रोज सायंकाळी साडेसहा ते सात वाजण्याच्या दरम्यान गावातील विविध भागात बिबट्याचे दर्शन होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत गावातील एका घराजवळ झाडावर बसलेल्या कोंबड्यांवर झडप घालण्यासाठी बिबट्याने थेट अंगणात उडी घेतली. यावेळी घरातील एका ज्येष्ठ नागरिकांचा थोडक्यात बचाव झाला. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे सावट अधिक गडद झाले आहे.



परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वन विभागाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत. प्रादेशिक वन अधिकारी दिपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वन कर्मचारी दिलीप केदारे व अशोक आरडे हे गावात भेटी देत नागरिकांना बिबट्यापासून बचावासाठी आवश्यक खबरदारीची माहिती देत आहेत. बिबट्याचा वावर असलेल्या ठिकाणी पाहणी करून शेतकरी व ग्रामस्थांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या जात आहेत.

दरम्यान, बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वन विभागाकडून युद्धपातळीवर मोहीम राबविण्यात येत असून अधिकारी व कर्मचारी रात्रंदिवस कार्यरत आहेत. लवकरच बिबट्याला पकडण्यात यश मिळेल, असा विश्वास वन विभागाने व्यक्त केला आहे. यासंदर्भात सरपंच राम घोडके यांनी ग्रामस्थांना संयम बाळगण्याचे आवाहन केले. ''कोणीही घाबरून जाऊ नये, मात्र प्रत्येकाने सतर्क राहून वन विभागाला सहकार्य करावे. रात्रीच्या वेळी विनाकारण बाहेर पडणे टाळावे, लहान मुलांना एकटे सोडू नये आणि बिबट्या दिसल्यास त्याचा पाठलाग किंवा छेडछाड न करता तात्काळ वन विभागाला माहिती द्यावी,'' असे त्यांनी सांगितले. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे वडघुल परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असले, तरी वन विभागाच्या सक्रिय मोहिमेमुळे लवकरच या समस्येवर तोडगा निघेल, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# स्वप्नाद्वारे प्रयत्न व कष्टाने जीवन यशस्वी करावे – सुदीप अगरवाल

### बोल फाऊंडेशनतर्फे भिंगारमधील विद्यार्थ्यांना शालेय संचांचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''प्रत्येक विद्यार्थ्याने मोठी स्वप्ने पाहावीत. त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, कठोर परिश्रम आणि सकारात्मक विचारांची जोड दिल्यास जीवनात यश निश्चित मिळते,'' असा प्रेरणादायी संदेश श्रीजी ग्रुपचे संचालक सुदीप अगरवाल यांनी दिला.

सलाबादप्रमाणे ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाऊंडेशनच्या शैक्षणिक उपक्रमांतर्गत शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ रोजी भिंगार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना शालेय संचांचे वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे सुदीप अगरवाल व सौ. स्मिता अगरवाल यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवर व विद्यार्थिनींच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी बोल फाऊंडेशनच्या सल्लागार उषा मेनन यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांचे शाळेत आगमन होताच विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देऊन त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

प्रास्ताविकात शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करत बोल फाऊंडेशनने गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण, समाजसेवा आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

मार्गदर्शन करताना सुदीप अगरवाल म्हणाले, ''मोठी स्वप्ने पाहणाऱ्यांचीच मोठी यशोगाथा घडते. कोणतेही ध्येय गाठण्यासाठी चिकाटी, मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्न आवश्यक आहेत. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे आणि देशाचे भविष्य उज्ज्वल करण्याचा संकल्प करावा.

ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाऊंडेशनचे संस्थापक गौरव पाटोळे यांनी संस्थेच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती देत समाजातील वंचित, निराधार, दुर्बल आणि गरजू घटकांना प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार मदतीचा हात दिला पाहिजे, हीच खरी समाजसेवा असल्याचे प्रतिपादन केले.

संस्थेच्या सचिव शोभा पाटोळे यांनी बोलताना, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करून त्यांचे भविष्य घडविण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष जोसेफ पाटोळे यांनी प्रमुख पाहुणे सुदीप अगरवाल यांचा शाल, रोपटे व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. तसेच सौ. स्मिता अगरवाल व उषा मेनन यांचाही शोभा पाटोळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक सुभाष भारूड यांनी केले. विद्यार्थी प्रसाद शेलार याने उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. शेवटी जोसेफ पाटोळे यांनी शाळा प्रशासन, शिक्षक, विद्यार्थी, मान्यवर आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

या उपक्रमामुळे शेकडो विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा लाभ झाला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आत्मविश्वास आणि नवीन उमेद निर्माण करणारा हा उपक्रम ठरला असून, बोल फाऊंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.

(पान १ वरून)

## १० टक्के आरक्षित जागा न सोडताच लेआउट मंजुरी

व तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचना श्री. राम चारठाणकर यांच्या कार्यकाळात विविध रेखांकन व बांधकाम परवानग्यांना मंजुरी देण्यात आली होती. या मंजुऱ्या देताना २०२० नंतर तुकडे पडलेल्या भूखंडांबाबत १० टक्के खुली/आरक्षित जागा सोडण्याच्या शासन आदेशाचे पालन झाले नाही याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. काही प्रकरणांमध्ये तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचना श्री. राम चारठाणकर यांच्या कार्यकाळात तात्पुरत्या रेखांकनांना मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर अंतिम मान्यता देताना शासन आदेशातील १० टक्के जागेची अट काटेकोरपणे तपासणे आवश्यक असतानाही, विद्यमान आयुक्त श्री. यशवंत डांगे व नगररचनाकार श्री. वैभव जोशी यांच्या कार्यकाळात अशा रेखांकनांना अंतिम मंजुऱ्या देण्यात आले आहे

नियमाप्रमाणे महानगरपालिकेला मिळणारी १० टक्के आरक्षित/खुली जागा उपलब्ध करून घेणे आवश्यक असताना तसे न करता मंजुरी दिल्यामुळे महानगरपालिका व शासनाचे लाखो करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहेराजकीय दबावाला बळी पडून शासनाच्या स्पष्ट निर्देशांकडे दुर्लक्ष करून या मंजुऱ्या देण्यात आल्या असून, शेख यांनी याबाबत नगररचना संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सविस्तर तक्रार केली होती. तक्रारीची गंभीर दखल घेत नगर रचना संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ०७ मे २०२६ रोजी आदेश निर्गमित करून नाशिक विभागाचे सहसंचालक नगर रचना श्री. आ. दि. बागुल यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली आहे. या समितीमध्ये श्री. वि. ल. वाघमोडे, सहसंचालक नगर रचना, संगणीकृत नियोजन कक्ष, पुणे तसेच श्रीमती दिपाली म. पाटील, सहाय्यक संचालक नगर रचना, नाशिक विभाग यांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर समितीमार्फत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने मंजूर केलेल्या बांधकाम परवानग्या व रेखांकन मंजुरी प्रकरणांची चौकशी करून वस्तुस्थितीनुसार अभिप्रायासह अहवाल संचालक कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या चौकशीमध्ये तत्कालीन आयुक्त श्री. पंकज जावळे व तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचना श्री. राम चारठाणकर यांच्या कार्यकाळात मंजूर झालेल्या बांधकाम परवानग्या, रेखांकन मंजुरी प्रकरणे विद्यमान आयुक्त श्री. यशवंत डांगे व नगररचनाकार श्री. वैभव जोशी यांच्या कार्यकाळातील अंतिम मंजुरी प्रकरणांची तपासणी करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. २०२० नंतर मंजूर झालेली सर्व रेखांकन प्रकरणे, भूखंड विभाजन प्रक्रिया, १० टक्के खुल्या जागेची तरतूद, शासन आदेशाचे पालन झाले नाही आणि महानगरपालिकेला झालेल्या संभाव्य आर्थिक नुकसानीची सखोल चौकशी करण्यात यावी, नियमांचे उल्लंघन करून दिलेल्या मंजुऱ्या रद्द करून शासन व महानगरपालिकेचे नुकसान करणाऱ्या जबाबदार अधिकारी व संबंधितांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

## माध्यमिक शिक्षक सोसायटीची ८३ वी वार्षिक सभा किरकोळ गोंधळ वगळता शांततेत

क्षेत्रातील विविध तरतुदींवर मार्गदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रगीत, सरस्वती पूजन व दिवंगत सभासद, शहीद जवान तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करून सभेला प्रारंभ झाला. बाबासाहेब बोडखे यांनी अध्यक्षपदासाठी आप्पासाहेब शिंदे यांच्या नावाची सूचना मांडली, तर सुनील दानवे यांनी अनुमोदन दिले. प्रास्ताविकात चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी संचालक मंडळाने सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत अत्यंत काटकसरीने कारभार केल्याचे सांगितले. जिल्हा बँकेकडून १२.५० टक्के व्याजदराने कॅश क्रेडिट घेत असतानाही सभासदांना केवळ ७ टक्के दराने कर्जपुरवठा करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संस्थेने अहवाल वर्षात ९७४ कोटी २९ लाख रुपयांचे कर्जवाटप केले असून त्यातून ५६ कोटी ७२ लाख रुपयांचा ढोबळ नफा, तर सर्व तरतुदी केल्यानंतर १३ कोटी ३४ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती त्यांनी दिली. यावर्षी ८ टक्के लाभांश मंजूर करण्यात आला असून सुमारे ९ कोटी ९७ लाख रुपये सभासदांच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

अहवाल वर्षात मयत निधीतून ४३ दिवंगत सभासदांचे ४ कोटी ४६ लाख रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले. तसेच त्यांच्या वारसांना २ कोटी ३३ लाख रुपये परत करण्यात आले.

कन्यादान/भाग्यलक्ष्मी योजनेंतर्गत ५४२ सभासदांना ८१ लाख ३० हजार रुपयांची मदत त्यांच्या मुला-मुलींच्या विवाहप्रसंगी देण्यात आल्याची माहितीही शिंदे यांनी दिली. संचालक मंडळाने ठेवीवरील व्याजदर ६.५० टयांवरून ७ टक्के केल्यामुळे ठेवींमध्ये मोठी वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले. खर्चात काटकसर करून मोठी बचत करण्यात आली असून २५ वर्षांनंतर दोन्ही ऑडिटरशी पत्रव्यवहार करून यंदा ऑडिट फीमध्ये तब्बल ९ लाख रुपयांची सवलत मिळविण्यात यश आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सभासदांच्या मुला-मुलींसाठी शहरात वसतिगृह उभारण्याच्या उद्देशाने महापालिकेकडे जागेची मागणी करण्यात आली असून, त्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो ऑडिट अहवाल. ऑडिटरने ऑफलाईन आणि ऑनलाईन नोंदींमध्ये मोठी विसंगती आढळून आल्याचे निदर्शनास आणून दिले असून सुमारे १५ कोटी रुपयांची तफावत असल्याचे सांगितले आहे. ही तफावत पूर्वीच्या कार्यकाळातील असल्याचा दावा करत नवीन संचालक मंडळ याची जबाबदारी स्वीकारणार नाही. या प्रकरणातील दोषींवर चौकशी करून कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा चेअरमन शिंदे यांनी दिला.

सचिव स्वप्निल इथापे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम केले तसेच वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आला. सभासद संतोष कानडे यांनी मागील वर्षी मंजूर झालेल्या 'अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर सहकारी सोसायटी' या नामांतराच्या ठरावाची अंमलबजावणी न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. यावर चेअरमन शिंदे यांनी प्रथम 'अहिल्यानगर' हे नाव अधिकृतरीत्या स्वीकारावे लागेल, त्यानंतर पुढील नामांतराची प्रक्रिया पूर्ण होईल, असे स्पष्ट केले. वैभव सांगळे यांनीही नामांतराचा मुद्दा उपस्थित केला.सौ. भांगरे यांनी कर्ज वितरणाच्या प्रक्रियेवर नाराजी व्यक्त केली. त्यावर संचालक मंडळाने सेवा कालावधी अत्यल्प उरलेल्या सभासदांना नियमांनुसार कर्ज देता येत नसल्याचे स्पष्ट केले. रमजान हवालदार यांनी नवीन संचालक मंडळाच्या पारदर्शक व उत्तम कारभाराबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला. सभागृहाने टाळ्यांच्या कडकडाटात त्याला मंजुरी दिली. संचालक बाबासाहेब बोडखे यांनी संस्थेत कोणत्याही परिस्थितीत नियमबाह्य कर्ज दिले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. जुनी थकबाकी वसूल करण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील संस्थांमध्ये थकबाकीदारांची नावे असलेले फलक लावण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज गवांदे यांनी संस्थेत कोट्यवधी रुपयांची तफावत निर्माण झाल्याने संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. त्यावर चेअरमन शिंदे यांनी दोषींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही आणि गुन्हे दाखल करण्यास संचालक मंडळ मागे हटणार नसल्याचे स्पष्ट केले.

सभेदरम्यान दारूच्या नशेत व्यासपीठावर आलेल्या एका सभासदाला बाहेर काढण्यात आले. तसेच प्रश्न विचारण्यासाठी अनेक सभासद एकाचवेळी व्यासपीठाकडे आल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. चेअरमन शिंदे यांनी सर्व प्रश्नांना क्रमाने उत्तरे दिली जातील, असे सांगून परिस्थिती नियंत्रणात आणली. काही सभासदांनी थकबाकीदारांची नावे वार्षिक अहवालात प्रसिद्ध करण्याची सूचना केली. संतोष कानडे यांनी लाभांश कमी मिळाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. रामदास जंजीरे यांनी एनपीएसाठी ३० लाख रुपयांची कर्जवसुली करण्याची मागणी केली, तर चांगदेव खेमर यांनी ऑडिट फीचा मुद्दा उपस्थित केला.

सभेदरम्यान काही काळ वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर सभेतील सर्व विषय मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली आणि सभेचा समारोप झाला. यावेळी माजी संचालक बाळासाहेब राजळे, सुरेश मिसाळ, ज्ञानेश्वर काळे, बाळासाहेब सोनवणे, कल्याण ठोंबरे, सत्यवान थोरे, कैलास रहाणे, चांगदेव खेमनर, ज्येष्ठ सभासद सुनिल पंडित, मिथून डोफ्लगरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर कानवडे यांनी केले.